## रे.दि.मु.नं.३२७/२०१२ मधील नि.२२ वरील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) थोडक्यात वादींचे कथन असे की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुद्ध निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी दशरथ भैरु येवले हे दि.०३/०७/२०१५ रोजी मयत झाले. त्यामुळे सदर मयत प्रतिवादी यांच्या वारसांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. त्या अनुशंगाने दाव्याचे सरनामेत प्रतिवादी दशरथ भैरु येवले यांचे नावास कंस करणेत यावा व त्यापुढे 'मयत वारस' असा शब्द लिहणेस, तसेच त्यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी.

३) प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांचे म्हणणे त्यांनी दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींच्या विना जबाब विचारात घेणेत येत आहे.

४) प्रस्तुत अर्जावर वादी व प्रतिवादी वकिलांचे म्हणणे ऐकले. दाव्याचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता दाव्याच्या योग्य न्यायनिर्णयासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक असल्याने सदरचा अर्ज मंजुर करणे उचित होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तरी मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

**आदेश**

१) सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) वादीने अर्जातील विनंतीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कालबद्धतेनुसार करावी व त्याप्रमाणे दुरुस्तीची प्रत त्वरीत दाखल करावी.

(दि. ह. दाभाडे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
वाई.

२०/०२/२०१६